# Cleanliness Activities

Cleanliness activities were conducted in Latur city, College Campus , adopted village and the villages where special camps were conducted (Mauje Bokramba, Kasargaon, Wagholi). These activities were also conducted in the Latur City at different social spaces, hospitals, Educational Institutes etc. These activities includes removal of garbage from organization of rallies, awareness about the cleanliness, etc.

**स्वच्छता अभियान, शोष खड्डे खोदणे :**

शिबीरातील स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी मौजे वाघोली येथे जि.प. शाळा व गावातील विविध चौक या ठिकाणी स्वच्छता अभियान राबवीत गाव स्वच्छ केला. गावात गावकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांच्या घराजवळ शोष खड्डे खोदून देण्यात आले. सुलभ शौचालयासाठी २५ ते ३० शोष खड्डे तयार करुन परिसर स्वच्छ करण्यात आला. गावातील विविध भागात नाल्या उपसून आंघोळीचे किंवा शौचालयाचे पाणी तुंबणार नाही याची व्यवस्था करुन दिली.




**स्वच्छ भारत सुंदर भारत अभियानांतर्गत अतिथी व्याख्यान व स्वच्छता मोहिम :**

दि. २९ ऑगस्ट, २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्तर विभागाच्या वतीने महाविद्यालयातील पर्यवेक्षक प्रा. सुचेता वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली 'स्वच्छ भारत सुंदर भारत' अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संभाजी पाटील यांनी स्वच्छतेचे महत्व, योगासन, प्राणायाम, प्रातभ्रमण इत्यादी आरोग्य विषयक सवयीची विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी रोज सकाळी लवकर उठण्याची सवय अंगी

बाळगावी व स्वतः आणि समाजाच्या आरोग्यासाठी नेहमी सतर्क रहावे असे सांगितले. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील आजूबाजूच्या परिसरातीची स्वच्छता केली.

